<u>नियमीत दरखास्त नंबर ०५/२०२३ मध्ये निशाणी ११ खालील आदेश</u>

<u>(जगदीश चव्हाण व इतर वि. दगुबाई जाधव व इतर)</u>

०१. सदरचा अर्ज हा हुकुमनामा धारकाने नियमीत दिवाणी दावा क्र.६०/२०१५ मध्ये पारीत करण्यात आलेल्या हुकूमनाम्याप्रमाणे दावा मिळकतीचे खरेदीखत नोंदवून देण्यासाठी न्यायालयीन आयुक्त म्हणून सहा.अधिक्षक, दिवाणी व फौजदारी न्यायालय, कळवण यांची नेमणुक करण्यासाठी दाखल केलेला आहे. सदरच्या अर्जावर ऋणको यांचे म्हणणे मागविण्यात आले आहे. परंतु, त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज त्यांच्याविरुध्द विनाजबाब चालविण्यात येतो.

०२. धनको यांच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला. ऋणको व त्यांचे विद्वान वकील गैरहजर असल्यामुळे सदरचा अर्ज त्यांच्याविरुध्द विनायुक्तिवाद चालविण्यात येतो.

०३. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २१, नियम ३४ अन्वये न्यायालयाला दस्तऐवज निष्पादन किंवा परक्राम्य संलेखांचे पृष्ठांकन करण्याचा अधिकार आहे. धनकोने सदरचा अर्ज हा न्यायालयीन आयुक्ताद्वारे हुकूमनाम्याप्रमाणे दावा मिळकतीचे खरेदीखत नोंदवून देण्यासाठी दाखल केला आहे. तसेच, ऋणकोने त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. परंतु, धनकोने सदरच्या अर्जासोबत कोणताही मसुदा दाखल केलेला नाही. धनकोने यापुर्वी ऋणको यांच्याकडून दावा मिळकतीचे खरेदीखत नोंदवून घेण्यासाठी कोणताही अर्ज दाखल केला नव्हता. त्यामुळे पहिल्यांदा नियमीत दिवाणी दावा क्र.६५/२०१५ च्या हुकूमनाम्याप्रमाणे दावा मिळकतीचे खरेदीखत नोंदवून देण्यासाठी ऋणको यांना आदेशीत करणे गरजेचे आहे. त्यामुळे सदरचा अर्ज हा अंशतः मंजुर होण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

१. ऋणको यांना आदेशीत करण्यात येत आहे की, त्यांनी सदर आदेशापासून १५ दिवसांच्या आत नियमीत दिवाणी दावा

क्र.६५/२०१५ च्या हुकूमनाम्याप्रमाणे दावा मिळकतीचे खरेदीखत धनको यांच्या लाभात नोंदवून द्यावे.

२. ऋणको यांनी धनको यांच्या लाभात १५ दिवसांच्या आत खरेदीखत नोंदवून दिले नाही तर धनको यांनी पुढील १५ दिवसांच्या आत खरेदीखताचा मसुदा न्यायालयात दाखल करावा.

३. मसुदा दाखल केल्यानंतर संबंधीत कर्मचा–याने सदर मसुद्याची प्रत नोटीसद्वारे ऋणको यांना बजावण्यात यावी.

४. ऋणको यांना मसुद्याची प्रत बजावल्यानंतर त्यांनी पुढील १५ दिवसांच्या आत त्यांचे म्हणणे व आक्षेप न्यायालयात सादर करावे.

५. खर्चाबाबत आदेश नाही.

DNYANESHWAR MADHUKAR GITTE

Digitally signed by DNYANESHWAR MADHUKAR GITTE
Date: 2025.02.01 16:53:28 +0530

दिनांक– २३.०१.२०२५. (डी.एम. गित्ते)

कळवण. सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कळवण.